# अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी शिवकृपा समाजाभिमुख पतसंस्था

## अविनाश धर्माधिकारी यांचे प्रतिपादन

कोरेगांव । निकोप सहकार जोपासत अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी शिवकृपा पतपेढी ही राज्यात

समाजाभिमूख, आदर्श पतसंस्था ठरल्याचे गौरवोद्‌गार पुण्याच्या चाणक्य मंडलचे संचालक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

शिवकृपा पतपेढीने एकहजार कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण केल्याच्या निमित्ताने चिंचवड (पुणे) येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजीत केलेल्या आनंद सोहळ्यात श्री. धर्माधिकारी बोलत होते. सोलापूर वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर, शिवकृपाचे अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

श्री. धर्माधिकारी पुढे म्हणाले, जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून एका विशिष्ठ ध्येयाने शिवकृपा पतपेढी कार्यरत आहेत, या संस्थेतील सेवकांची विनम्रता, त्यांची कामाची पध्दत ही राज्यातील सहकाराला मार्गदर्शक असून संस्थेच्या कामातच वेगळा आनंद मानून हे सर्वजण काम करत आहेत. ज्या कामात आनंद नाही ते करण्यापेक्षा ज्यातून समाजाच्या भल्यासाठी काहीतरी देता येईल ते काम आनंदाने करा, स्वामी विवेकानंदांच्या विचारांची हीच खरी शिकवण असल्याचेही ते म्हणाले. शिवकृपाचा वार्षिक अहवाल, व्यवसायवृद्धी, सहकाराचे निकष पालन, व्यवस्थापन व संचालक




'शिवकृपा' पतपेढीच्या १ हजार कोटींच्या संकल्पपूर्तीचा फलक अनावरण करून आनंद सोहळ्याचा शुभारंभ करताना अविनाश धर्माधिकारी सोबत अविनाश भोसले, हणमंत गायकवाड, चंद्रकांत वंजारी, कृष्णा शेलार, पंढरीनाथ भोसले भिमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, पांडुरंग घाडगे आदी.

विश्वस्थांची ध्येयधोरणे, योगदान याशिवाय अधिकारी, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या कार्याची सचोटी, शिस्त, आचारसंहिता या सर्वांच्या एकत्रीकरणामुळेच शिवकृपाची उत्कृष्टता संपूर्ण राज्यभर झाली आहे. या संस्थेने इतरांना मार्गदर्शन करावे व सहकारातील इतर पतसंस्थांनी शिवकृपाचा आदर्श दृष्टीक्षेपात ठेवून वाटचाल करावी असे चांगले काम निर्माण केल्याचेही ते म्हणाले.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक, संचालक चंद्रकांत वंजारी यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. गेल्या २८ वर्षात जे झाले नाही ते सर्वांच्या योगदानाने अवघ्या ५ वर्षात निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात व्यवसायाचे अनेक टप्पे यशस्वीरीत्या पूर्णत्वास जातील असेही ते म्हणाले.

वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर म्हणाले, शिवकृपाचे युवा नेतृत्व पाहिल्यानंतर ही संस्था हायटेक होत चालल्याचे अभिमानाने नमूद करावे लागेल, नव्या वर्षात नवे संकल्प घेवून पुढे जाणारी ही संस्था निश्चित राज्यातील क्रमांक एकची संस्था ठरेल यात आता तिळमात्र शंका नाही. सर्वांचे प्रभावी योगदान आणि एकरूप होवून काम करण्याची तळमळ निश्चितच या यशापर्यंत घेवून जाईल असेही ते म्हणाले.

संस्थेचे अध्यक्ष अविनाश भोसले म्हणाले, सहकार चळवळीत वेगळेपण जोपासत शिवकृपाने आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच १ हजार कोटींच्या संकल्पपूर्तीसाठी सर्वांनी योगदान दिले, या उद्दीष्टपूर्तीसाठी झटणाऱ्या शिवकृपा परिवारातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सुवर्णयुग निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगून येत्या काही दिवसात शिवकृपाच्या आठ शाखा जनसेवेत रूजू होत असल्याची घोषणा करून त्यासाठी नव्या नियुक्त्याही त्यांनी जाहीर केल्या.

प्रारंभी मुंबई सहकार बोर्डावर संचालकपदी निवड झाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक, संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी यांचा संस्था परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा आरंभ संतोष देशमुख यांनी स्वागत व ओंकार अराधनेने केला. संस्थेचे मुख्याधिकारी पांडुरंग घाडगे यांनी अतिथींचा परिचय करून दिला.

यावेळी संस्थेचे संस्थापक, संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष वसंतराव चव्हाण, भिमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, सखाराम संपकाळ, जयवंत खामकर, सोपान बोराडे, अशोक तुपे, बबन काटे यांच्यासह सर्व संचालकांनी तसेच प्रातिनिधीक स्वरूपात कर्मचारी प्रतिनिधी, ठेव संकलन प्रतिनिधींनीही मनोगत व्यक्त केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी संचालक शिवाजीराव ऐवळे, वरिष्ठ व्यवस्थापक संदीप जाधव यांनी केले. तर संस्थेचे उपाध्यक्ष हणमंत गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास शिवकृपाच्या ५५ शाखांचे सुमारे चौदाशे कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी उपस्थित होते.